**सहाय्यक (गट-क) या संवर्गात तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात पदोन्नती/नेमणूक**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०२१/3531 /प्र.८**
**दिनांक : 24 DEC 2021**

**आदेश :-**

प्रशासकिय हित व कामाची निकड लक्षात घेऊन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **वरिष्ठ लिपीक (गट-क)** संवर्गात असलेल्या कर्मचाऱ्याची खालील अटी व शर्तींना अधीन राहून **सहाय्यक (गट-क)** या संवर्गात **एस.१४ रु.३८६००-१२२८००** या सुधारित वेतन स्तरामध्ये पुर्णपणे तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात पदोन्नती देण्यांत येत आहे. पदोन्नती नंतर त्यांची पदस्थापना खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | सद्याचे कार्यालय | पदोन्नती नंतरचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. राखी अनिलसिंग बैस | मुंबई मंडळ | कार्यकारी अभियंता (विद्युत)/मुंबई मंडळ | श्रीमती पी.पी. शिंदे यांचे सेवानिवृत्तीने रिक्त पदी |
| २ | श्री. संतोष अंबादास कदम | औरंगाबाद मंडळ | औरंगाबाद मंडळ | रिक्त पदी |
| ३ | श्रीम. हेमलता रमेश हिंदूराव | मुंबई मंडळ | उपमुख्य अभियंता-बी.डी.डी./मुं.मं | श्रीमती. पी.के.शिंदे यांचे पदोन्नतीने रिक्त पदी |
| ४ | श्रीम. सीमा प्रमोद मोटे | प्राधिकरण | उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा. | रिक्त पदी |
| ५ | श्री. मनोज श्रीकृष्ण डिचवलकर | मुं इ दु व पु मंडळ | मिळकत व्यवस्थापक/ बोरिवली/ मुं.मं | रिक्त पदी |
| ६ | श्री.संदीप गंगाधर पाटील | मुं इ दु व पु मंडळ | मिळकत व्यवस्थापक-वांद्रे (पू र्व)/मुंमं. | रिक्त पदी |
| ७ | श्री.प्रेमनाथ बाबूराव साबळे | नाशिक मंडळ | मिळकत व्यवस्थापक-वांद्रे (पश्चिम) /मुंमं. | रिक्त पदी |
| ८ | श्रीम.सुनिता अमोल टाकळे (श्रीम.सुनिता पांडुरंग खाडे) | मुं इ दु व पु मंडळ | उपमुख्य अधिकारी/ (पश्चिम) /मुंमं. | रिक्त पदी |
| ९ | श्रीम .शितल रविंद्र साळुंखे श्रीम.शितल मानसिंग पाटील | नाशिक मंडळ | विशेष भुसंपादन अधिकारी/मुं इ दु व पु मंडळ | रिक्त पदी |
| १० | श्री.राजेश सितताराम हिंगमिरे | नाशिक मंडळ | उपमुख्य अधिकारी (पणन)/मुं. मं | रिक्त पदी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | श्रीम.वैशाली सचिन पणेर | नाशिक मंडळ | उपमुख्य अभियंता-बी.डी.डी./मुं.मं | रिक्त पदी |
| १२ | श्री.सुधीर तुकाराम तापकिर | पुणे मंडळ | प्रशासकीय अधिकारी//मुं इ दु व पु मंडळ | रिक्त पदी |
| १३ | श्रीम.ज्योती स.पवार | मुं इ दु व पु मंडळ | स.ले.अ. परि-४/मुं इ दु व पु मंडळ | रिक्त पदी |
| १४ | श्री.मंगेश ब. नायकोडी | पुणे मंडळ | पुणे मंडळ | रिक्त पदी ०१ जानेवारी-२०२२ च्या प्रभावाने |
| १५ | श्री.संजय बा. साधवा | मुं इ दु व पु मंडळ | कार्यकारी अभियंता/-वांद्रे /मुंमं. | रिक्त पदी ०१ जानेवारी-२०२२ च्या प्रभावाने |

२/- उक्त पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय मूळ वेतनाबरोबर महागाई भत्ता व इतर भत्ते नियमानुसार देय राहतील. तसेच अ.क्र. ७,९,१०,११, व १२ वरील कर्मचाऱ्यांस नियमानुसार पदग्रहण अवधी व बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.

३/- सदरहू, पदधारकाच्या तात्पुरत्या पदोन्नतीने केलेल्या नेमणूका, प्रशासकिय सेवा संवर्गाच्या अंतिम सेवाप्रवेश नियमांच्या अधीन राहून त्यांना पदोन्नतीच्या व अन्य संवर्गात ज्येष्ठतेनुसार तसेच त्यांची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपाची असल्याने त्यांच्या या संवर्गातील कायम पदांवर कोणताही हक्क/अधिकार राहणार नाही, या अटीवर करण्यांत येत आहे.

४/- प्रशासकिय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठतम संबंधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

५/- उक्त पदधारकांनी वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन १०८२/सीआर-११००/एफ/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आंत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतननिश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ (१-अ) मधील तरतूदीनुसार करण्यांत येईल.

६/- शासनाच्या सामन्य प्रशासन विभागाकडील दि.८/६/१९९५ च्या एसआरव्ही-१०९५/प्रक्र.१/९५/बारा या क्रमांकाच्या आदेशान्वये वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची योजना कार्यान्वित केली असून, उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून ती प्राधिकरणातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाच्या दि.१२.डिसेंबर १९९५ च्या एमएच/एस्टीपी/१५९५/५३८/प्र.१३ या क्रमांकाच्या आदेशान्वये लागू करण्यांत आली आहे. तसेच वित्त विभागाच्या क्र.वेतन १११९/प्र.क्र.२/९९ सेवा-३, दिनांक २० जुलै २००१ च्या शासन निर्णयानुसार व शासनाच्या दि.२ मार्च २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांचा सुधारित सेवांतर्गत आशवासित प्रगतीयोजनेच्या अनुज्ञेयबाबत लाभ देण्यात आला आहे. वरील कर्मचाऱ्यांनी एकाच पदावर १०,२०,३० वर्षे सेवा पूर्ण केली आहे व या कारणास्तव या कर्मचाऱ्यास सदर योजनेनुसार यापूर्वी लाभ दिला

असल्यास त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यांत येऊ नये. याबाबत संबंधितांच्या सेवा पुस्तकाची तपासणी करुन पुढील कार्यवाही करावी.

७/- शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्रक्र.१/९५/बारा दि.८/६/१९९५ नुसार वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्याच्या संधीच्या योजनेचा लाभ या आदेशातील ज्या कर्मचाऱ्यांना दिलेला आहे. त्यांनी पदोन्नती जर नाकारली तर त्यांना मुळ पदावर पदावनत करण्यात येईल. त्यांना देण्यात आलेला सदर योजनेचा लाभा काढून घेण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

८/- उक्त आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत संबंधित पदधारकाने पदोन्नतीच्या नेमणूकीच्या ठिकाणी कामावर रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

९/- पदोन्नत पदधारक हे पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी तात्काळ रुजु न झाल्यास, त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहित धरण्यांत येईल. तसेच याबाबत शासन निर्णय दि.१२.०९.२०१६ मधील तरतूदीनुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल व पदोन्नतीसाठी पुढील २ वर्षे त्यांचे नावाचा विचार करण्यात येणार नाही. तिसऱ्या वर्षी त्यांचे नांव विभागीय पदोन्नती समितीसमक्ष सादर करण्यात येईल.

१०/- संबंधित मुख्य अधिकाऱ्यांनी/ विभाग प्रमुख यांनी पदोन्नत झालेल्या पदधारकांचे निश्चित पदस्थापनेचे स्वतंत्र आदेश काढावेत व त्याची प्रत प्राधिकरणाकडे पाठवून द्यावी. तसेच, संबंधित पदधारकांचे सेवापुस्तिका, अंतिम वेतन निश्चिती प्रमाणपत्र व वैद्यकिय नोंदवही (मेडीकल डायरी) पदोन्नतीनंतर रुजू होणाऱ्या कार्यालयात पाठवावी.

११/- मा.उच्च न्यायलय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनूसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनूसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१२/- उपरोक्त कर्मचाऱ्यांची दिनांक **३१/०३/२०२१** रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरित करण्यात येऊ नयेत. तसेच, आदेश हस्तांतरित करण्यापूर्वी सदर कर्मचाऱ्यांची मत्ता व दायित्व सादर केल्याचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करावा.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**प्राधिकरण यांचे मान्यतेने.**

(राजकुमार सागर)
**सचिव/प्राधिकरण**

**प्रति,**

**-----------------------------------------**

**(संबंधित विभागप्रमुखां मार्फत)**

**प्रत सस्नेह अग्रेषित**

१) मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा

२) मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व. पु.मंडळ

३) मुख्य अभियंता- १,२,३ /प्रा

४) वित्त नियंत्रक /प्रा

५) विधी सल्लागार/प्रा

६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा

७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा

८) मुख्य अधिकारी, मुं.झो.सु.मं, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ

९) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा

१०) सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व. पु.मंडळ

११) मुख्य लेखाधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व. पु.मंडळ

१२) मुख्य लेखाधिकारी, मुं.झो.सु.मं, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ

१३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी/प्रा

१४) संचालक, पी.डी.सी. पुणे

१५) माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष/प्रा. यांना माहिती तथा म्हाडाच्या संकेत स्थळावर आदेश प्रसिध्दिकरीता.

१६) सक्षम प्राधिकारी/प्रा

**प्रत :** प्रशासकिय अधिकारी, प्राधिकरण-१,२ मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व. पु.मंडळ, मुं.झो.सु.मं, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

मा.उपाध्यक्ष/प्रा यांचे स्वीय सहाय्यक
कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग
अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना

**प्रत :** प्रशासन- ६,८,९,१०,११,१२,१३/प्रा.